सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | शनिवार, १४ मार्च २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# कर वाढ नसलेले १३८३ कोटींचे प्रशासकीय अंदाजपत्रक

## महापालिका आयुक्तांनी स्थायी सभापती रंजिता चाकोते यांच्याकडे केले सादर

## महसुली जमेतून मिळणार ९२४ कोटी रुपये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मार्च-**

महापालिका प्रशासनाने गत अंदाजपत्रकात ९० कोटी रुपयांची वाढ करत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील तयार केलेले मनपा उत्पन्न ९२४ कोटी ४५ लाख रुपये, शासन अनुदान ३४७ कोटी आणि कर्ज विभाग १११ कोटी रुपये असे तिन्ही मिळून एकूण १३८३ कोटी रुपयांचे कोणतीही करवाढ नसलेले प्रशासकीय अंदाजपत्रक महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांना सादर केले. दरम्यान, या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभेत मान्यता घेतल्यानंतर सर्वसाधारण सभेमध्ये याला मंजुरी देण्यात येणार आहे.



यावेळी महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेविका रोहिणी तडवळकर, अश्विनी चव्हाणख संगीता जाधव, कल्पना कदम, नगरसेवक भारतसिंग बडूरवाले, सतीश सिरसिल्ला, अमर पुदाले, सत्यनारायण गुर्रम, बिज्जू प्रधाने, मुख्य लेखापाल डॉ.रत्नराज जवळगेकर, उपायुक्त आशिष लोकरे, परिवहन व्यवस्थापक तपन डंके, कर संकलन विभाग अधीक्षक युवराज गाडेकर आदी उपस्थित होते.




महापालिका स्थायी समितीकडे तब्बल आठ वर्षानंतर अंदाजपत्रक सादर करण्यात आले. यादरम्यान, मार्च २०२२ पासून चार वर्षे प्रशासकीय राजवट असल्याने महापालिका आयुक्त तथा प्रशासकांनीच अंदाजपत्रकास मान्यता दिली होती. सन २०१८ नंतर स्थायी समितीला चेअरमन लाभले आहेत. त्यानंतर आज महापालिका आयुक्तांनी स्थायीकडे हे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यानंतर स्थायी समितीचे सभापती महापालिकेच्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेत ते मांडतात. त्यानंतर यावर चर्चा व सुधारणा होऊन महापालिका सर्वसाधारण सभेमध्ये अंतिम मंजुरी देण्यात येते. दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अंदाजपत्रकासंदर्भात पत्रकारांना माहिती दिली. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रक सादर करताना महापालिका प्रशासनाने सन २०२५-२६ चे सुधारित अंदाजपत्रक देखील सादर केले आहे. सन २०२६- २७ च्या अंदाजपत्रकात महसुली विभागामध्ये महसुली विभाग ७६१ कोटी ६२ लाख ०१ हजार, पाणीपुरवठा १३८ कोटी २९ लाख ६० हजार आणि भांडवलीमध्ये २४ कोटी ५१ लाख आणि आरंभी शिल्लक २ लाख ५७ हजार ४०१ असे ९२४ कोटी ४२ लाख ६१ हजार तर खर्चामध्ये महसूल विभाग ७२९ कोटी ८७ लाख ९७ हजार, पाणीपुरवठा १३३ कोटी ३८ लाख ९४ हजार आणि भांडवली कामासाठी ६१ कोटी १५ लाख ७० हजार आणि अखेरची शिल्लक २ लाख ५७ हजार ४०१ अशी खर्च बाजू धरण्यात आली आहे. शासन अनुदान ३४७ कोटी ९२ लाख जमा आणि तितकेच खर्च तर कर्ज विभागामध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान पर्जन्य जलवाहिनी मनपा हिस्सा २९ कोटी ४० लाख , महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान मलनित्सारण योजना मनपा हिस्सा कर्ज ७१ कोटी ६१ लाख, आणि सोलापूर शहर अंतर्गत पाणीपुरवठा सुधारणा योजनेसाठी मनपा हिस्सा मुन्सिपल बाँड स्वरूपात उभारणे १० कोटी रुपये असे एकूण कर्ज व म्युन्सिपल बॉण्ड मिळून १११ कोटी ०१ लाख रुपये इतके जमा व खर्च असे महसुली उत्पन्न, शासन अनुदान आणि कर्ज तिन्ही मिळून एकूण प्रशासकीय अंदाजपत्रक १३८३ कोटी ३८ लाख १८ हजार ४०१ इतके सादर करण्यात आले.

अंतर्गत जलवाहिनी सुधारणा योजनेसाठी सुधारित तेराशे कोटींचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. यापूर्वी तो ८९२ कोटींचा होता येणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये त्याला मंजुरी घेण्यात येणार आहे. याच योजनेसाठी म्युनिसिपल बाँड काढण्यात येणार आहेत. समाज कल्याण विभाग निधी अंतर्गत दोन वर्षात अडीच कोटींप्रमाणे पाच कोटी थकबाकी त्याचबरोबर चालूचे तीन कोटी असे एकूण आठ कोटी रुपये विशेष बाब म्हणून तरतूद करण्यात येत आहे.

### अडीचशे कोटी रुपये कर्मचाऱ्यांची देणे

सोलापूर महापालिकेकडील कर्मचाऱ्यांना विविध वेतन फरकापोटी व इतर असे एकूण २५० कोटीची देणे आहेत. महापालिकेचे उत्पन्न वाढेल तसे टप्प्याटप्प्यात ही देणे कर्मचाऱ्यांना अदा केली जाणार आहेत. दरम्यान महापालिकेतील वेतन म्हणजेच आस्थापना खर्च एकूण ४१ टक्के आहे. यामध्ये वेतन भत्ते २७ टक्के, निवृत्ती वेतन १४ टक्के असे मिळून एकूण ३८५ कोटी रुपये खर्च आहे

### सुपर टॅक्स आकारणी मागील वर्षापासूनच बंद

सोलापूर महापालिकेकडून सुपर टॅक्स आकारणी एक एप्रिल २०२५ पासूनच बंद करण्यात आली आहे. संबंधितांचे अर्ज आले तसे टॅक्स कमी करून दिला आहे. महापालिका तत्कालीन आयुक्त शितल तेली यांच्या कार्यकाळात २० फेब्रुवारी २०२५ रोजी सुपर टॅक्स रद्दचा ठराव करण्यात आला होता त्यानंतर विद्यमान आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या कार्यकाळात याची आकारणी बंद केल्याचे सांगण्यात आले. बँक आणि विविध मॉल्स असे एकूण सुमारे २५० मिळकतदार आहेत. साधारणतः ४९ टक्के वाढीव हा टॅक्स होता.

### भांडवली कामासाठी उपलब्ध होणारी रक्कम

भांडवली कामासाठी उपलब्ध होणारी रक्कम अशी विकास शुल्क २४ कोटी रुपये, गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोयी करणे- ५१ लाख रुपये, महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग करण्याची रक्कम ३१ कोटी ७४ लाख ४ हजार रुपये , पाणीपुरवठा निधीतून भांडवली कामासाठी वर्ग करण्याची रक्कम ४ कोटी ९० लाख ६६ हजार असे एकूण ६१ कोटी १५ लाख ७० हजार रुपये आहेत.

### असा होणार भांडवली कामांवर खर्च

वार्डवाईज कामे- १८ कोटी ४८ लाख , सी एन एस रोड ५४ मीटर रस्ता येथे पथदिव्यांची सोय करणे ७५ लाख रुपये ट्रान्सफॉर्मर फुल शिफ्टिंग करणे ९१ लाख रुपये, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यान विकास कामे करणे - २५ लाख रुपये, नवीन शाळा इमारत बांधणे - ३ कोटी ३६ लाख रुपये

### विविध योजनेसाठी महापालिका हिस्सा

३२ कोटी ६४ लाख , जागा संपादन करणे आणि जागा ताब्यात घेणे- २५ लाख , गुंठेवारी खर्च- ५१ लाख, डीपीआर तयार करणे- ४ कोटी आदी.

### असे आहे मागील वर्षांचे बजेट

सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक १०५५ कोटी रुपयाचे होते. मागील २०२३ - २४ चे अंदाजपत्रक हे १०७५ कोटी १९ लाख रुपयाचे होते. सन २०२४-२५ चे एकूण १ हजार १५७ कोटी २३ लाख १६ हजार ४०१ रुपयांचे अंदाजपत्रक होते. यंदा सन २०२५ - २६ चे अंदाजपत्रक एकूण १२९३ कोटी ३० लाख १३ हजार ४०१ रुपयाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली. सन २०२६- २७ चे प्रशासकीय अंदाजपत्रक १३८३ कोटी ३८ लाख १८ हजार ४०१ रुपये इतके सादर केले आहे.

### असा येणार रुपया

विवरण असे- अंदाज रक्कम- शेकडा प्रमाण : मनपा करापासून उत्पन्न - १९१ कोटी ४६ लाख ५० हजार- २०. ७१ पैसे, निश्चित महसूली उत्पन्न- २५ कोटी ८५ लाख- २. ८० पैसे, महापालिकेच्या मालमत्तेपासून भाडे उत्पन्न- १९ कोटी ६४ लाख ५० हजार- २. १३ पैसे, शुल्क आणि वापरकर्ता शुल्क- १२१ कोटी ७२ लाख ८१ हजार- १३. १७ पैसे, विक्री आणि भाडे- २ कोटी १० लाख ७५ हजार- ०. २३ पैसे ,महसुली अनुदान- ३९५ कोटी ५६ लाख ३५ हजार- ४२. ७८ पैसे, गुंतवणुकीतून उत्पन्न- ४ कोटी- ०. ४३ पैसे, दिलेल्या कर्जावरील व्याज १० लाख ५० हजार- ०.०१ पैसे, इतर उत्पन्न- १ कोटी १६ लाख- ०. १३ पैसे, पाणीपुरवठा जमा- १३८ कोटी २९ लाख ६० हजार- १४. ४६ पैसे, भांडवली जमा ३४ कोटी ५१ लाख- २. ६५ पैसे, एकूण- ९२४ कोटी ४२ लाख ६१ हजार- १०० पैसे.



**असा खर्च होणार रुपया :** विवरण असे- अंदाज रक्कम - शेकडा प्रमाण - पाणी पुरवठा व्यतिरिक्त कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते- २५० कोटी ७६ लाख ९८ हजार- २७. १३ %, मनपा कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन, कुटुंब वेतन- १३५ कोटी ४८ लाख १ हजार- १४. ६६, प्रशासकीय खर्च- २० कोटी १ लाख ४० हजार- २. १७, देखभाल व दुरुस्ती- १४७ कोटी ३७ लाख १९ हजार- १५. ९४, घेतलेल्या व घ्यावयाच्या कर्जावरील खर्च- २२ कोटी ६ लाख ९ हजार २. ३९, कार्यक्रम व योजनांवरील खर्च- ६८ कोटी ५४ लाख ३४ हजार- ७. ४१, महसुली अनुदाने, देणग्या, योगदाने- १९ कोटी ९२ लाख ९६ हजार- २. १६, घसारा निधी- १ कोटी १५ लाख- ०. १२, कर्जे, अग्रीम आणि ठेवी- २५ लाख- ०. ०३, मक्तेदारांची मेंटेनन्स कामाची प्रलंबित देय रक्कम - १० कोटी रुपये, करावरील सूट व परतावा- २९ कोटी- ३. १४, पाणीपुरवठा खर्च- १३३ कोटी ३८ लाख ९६ हजार- १४. ४३, स्थिर मालमत्ता- २५ कोटी ३१ लाख - २. ७४, भांडवली खर्च- ६१ कोटी १५ लाख ७० हजार- ६. ६२, भांडवली खर्चामध्ये वॉर्ड वाईज कामासाठी १८.४८ कोटी रुपये, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यान विकास कामे करण्यासाठी २५ लाख रुपये यासह विविध कामांचा समावेश आहे. असे एकूण खर्च- ९२४ कोटी ४२ लाख ६१ हजार.

# 'त्या' सात ग्रामसेवकांवर निलंबनाची टांगती तलवार

## नव्या ठिकाणी रुजू होण्यास टाळाटाळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**


जून ते जुलै २०२५ या कालावधीत बदली आदेश देण्यात आलेल्या १७ ग्रामसेवकांपैकी काहींनी नव्या ठिकाणी रुजू होण्यास टाळाटाळ केल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी सर्व १७ ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. नोटीस मिळाल्यानंतर १० ग्रामसेवकांनी तत्काळ पदभार सोपवून नव्या ठिकाणी हजेरी लावली.

मात्र, सात ग्रामसेवक अद्यापही रुजू झालेले नाहीत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी संबंधित सात ग्रामसेवकांची सविस्तर माहिती मागवली असून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बदली प्रक्रियेत एकाच ठिकाणी सहा ते दहा वर्षांपर्यंत कार्यरत असलेल्या ग्रामसेवकांची बदली करण्यात आली होती. मात्र, काही ग्रामसेवकांनी नवीन ठिकाणी रुजू होण्यास टाळाटाळ केल्यामुळे प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. नोटीस दिल्यानंतर बहुतेकांनी आदेशाचे पालन केले असले तरी सात ग्रामसेवक अद्यापही गैरहजर असल्याने त्यांच्या विरोधात कारवाई अपरिहार्य ठरणार आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या इतिहासात बदलीच्या ठिकाणी रुजू न झालेल्या ग्रामसेवकांवर निलंबनाची कारवाई होण्याची ही पहिलीच वेळ ठरण्याची शक्यता असल्याचे प्रशासनातील सूत्रांनी सांगितले.

# उजनीतून मार्चअखेर सुटणार उन्हाळी पिकांसाठी पाणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

सोलापूरचे तापमान ४० अंश सेल्सिअसवर पोचले आहे. कडक उन्हामुळे शेतीपिकांसाठी दोन-तीन दिवसाला पाणी द्यावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर उजनी धरणातून २० मार्चनंतर सलग ८० दिवस डाव्या व उजव्या कालव्यातून, बोगदा, उपसा सिंचन योजनांमधून पाणी सोडले जाणार असल्याची माहिती मिळाली.



उजनी धरणात सध्या ९५.७० टीएमसी पाणी आहे. पुढील आठवड्यात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीची बैठक होईल. त्यात अंतिम निर्णय होणार आहे.उन्हाळ्यातील शेतीच्या आवर्तनासाठी उजनीतून जवळपास साडेआठ टीएमसी पाणी सोडावे लागते. दुसऱ्या आवर्तनासाठी सात-साडेसात टीएमसी पाणी लागते. तसेच भीमा-सीना जोड कालव्यातून चार टीएमसीची (प्रत्येकी दोन टीएमसी) दोन आवर्तने सोडली जाणार आहेत. मात्र, भीमा नदीतून मार्चऐवजी एप्रिलअखेर पाणी सोडले जाऊ शकते. दरम्यान, दरवर्षी मार्च-एप्रिलमध्ये पाणी सोडल्यानंतर मे महिन्यात उजनी धरण हमखास उणे पातळीत जायचे. धरण उणे २० टक्के झाल्यावर दोन्ही कालव्यातून पाणी सोडणे बंद होते. उन्हाळ्यातील दोन्ही आवर्तने सोडूनही यावर्षी धरणातील साठा प्लसमध्येच असणार आहे. जिल्ह्यातील दीड लाख हेक्टर क्षेत्र उजनीमुळे ओलिताखाली आले आहे. शेतीसाठी डावा- उजवा कालवा, सीना-माढा व दहिगाव उपसा सिंचन योजना आणि बोगद्यातून पाणी सोडले जाते.

सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी समांतर जलवाहिनी झाल्याने यंदा उजनीतून भीमा नदीद्वारे सोलापूर शहरासाठी पाणी सोडावे लागले नाही. त्यामुळे उजनी धरण पावसाळा सुरू होईपर्यंत प्लसमध्येच राहील, असे लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# गॅस सिलेंडरसाठी सोलापूरकरांचा ठिय्या

## प्रशासनाने कंपन्यांना दिल्या सूचना | सोलापुरात १५ दिवस पुरेल इतका पेट्रोल, डिझेल साठा | राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मार्च-**

घरगुती गॅस बुकिंग सुरु नसल्यामुळे काही ठिकाणी नागरिकांनी एजन्सीसमोर सिलेंडर ठिय्या मांडला होता. या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासनाने गॅस कंपन्यांना तातडीने बुकिंग सुरु करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

सोलापुरात १५ दिवस पुरेल इतका पेट्रोल व डिझेलचा साठा उपलब्ध आहे. घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

दरम्यान, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सोलापूर शहर-जिल्ह्यातील इंधन व गॅस पुरवठ्याचा आढावा घेतला. जिल्ह्यात कोणत्याही परिस्थितीत घरगुती गॅसची टंचाई भासू नये यासाठी महसूल प्रशासनाने दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. सोलापूर जिल्ह्यात घरगुती गॅस पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. मात्र औद्योगिक वापरासाठी गॅस पुरवठा तात्पुरता थांबविण्याच्या सूचना राज्य शासनाकडून देण्यात आल्याने औद्योगिक क्षेत्रासाठी गॅस पुरवठा केव्हा सुरू होईल, याबाबत स्पष्टता नसल्याचे सांगण्यात आले.




**निराळे वस्ती परिसरातील पृथ्वीराज गॅस एजन्सी समोर नागरिकांनी गॅस मिळण्यासाठी दुकान उघडण्या अगोदरच ठिय्या मांडला होता. शुक्रवारी टिपलेले छायाचित्र.**

### संयुक्त तपासणी मोहिम; संबंधित विभागांची आज बैठक

पुरवठा विभाग, महसूल कर्मचारी आणि पोलीस प्रशासनाकडून संयुक्त तपासणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. शहर व जिल्ह्यातील २७ गॅस वितरण केंद्रांना भेट देत तपासणी करण्यात आली. आश्रम शाळा, रुग्णालये आणि इतर अत्यावश्यक सेवांना गॅस पुरवठा सुरळीत राहावा यासाठी शुक्रवार, दि.१३ मार्च रोजी संबंधित विभागांची बैठक बोलाविण्यात आली आहे. प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे आणि पेट्रोल-डिझेल वितरण करणाऱ्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.




# शासकीय योजना, रुग्णालयांसाठी गॅस सिलेंडरची सोय

## प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांनी दिल्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

मध्यपूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील व्यावसायिक गॅस पुरवठा आवश्यक असणाऱ्या सर्व संबंधित शासकीय विभाग, जिल्ह्यातील सर्व प्रकारचे रुग्णालय यांना व्यावसायिक गॅस पुरवठा मागणीप्रमाणे केला जाणार आहे.

तरी संबंधित विभागांनी तालुकानिहाय याद्या पुरवठा विभागाला उपलब्ध करून द्याव्यात. संबंधित तालुक्यातील एजन्सीकडून व्यावसायिक गॅसचा पुरवठा संबंधित यंत्रणांना होणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली. एलपीजी पुरवठा बाबतच्या बैठकीत जंगम मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, शहर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, जिल्हा परिषदेचे महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा समन्वयक प्रसाद मिरकले, समाजकल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.वर्षा डोईफोडे, महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ.राखी माने आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसीएल कंपनीच्या ९४ गॅस एजन्सीकडून घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा केला जातो. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या ४ हजार ९२ शाळांपैकी ३६०० शाळांना शालेय पोषण आहारासाठी घरगुती गॅस सिलेंडर पुरवठा केला जातो. जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांना व्यावसायिक गॅस कनेक्शन दिलेले आहेत. १५० वसतिगृहांना वैयक्तिक गॅस कनेक्शन आहेत. राज्य समाज कल्याण विभागाच्या १६ वसतिगृहे व दोन आश्रम शाळांना व्यावसायिक गॅस कनेक्शन आहेत. इतर बहुजन मागास विभागाचे दोन वस्तीगृहे व ९७ आश्रम शाळा, जिल्हा परिषद आरोग्य विभाग ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रांना व्यवसायिक गॅस पुरवठा केला जातो, असे सांगण्यात आले.

### घरगुती गॅस सिलेंडरची अडचण नाही

व्यावसायिक गॅस सिलेंडर अत्यावश्यक सेवासाठी मागणीप्रमाणे उपलब्ध केला जाणार आहे. घरगुती गॅस पुरवठा कंपन्यांकडून उपलब्ध केला जात आहे. घरगुती गॅस सिलेंडरची कोणत्याही प्रकारची अडचण नाही, असे एचपीसीएलचे प्रतिनिधी विनोद कुमार यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापुरातून होणाऱ्या निर्यातीला खो; ८४ टन पापड गोडावूनमध्ये पडून

## महालक्ष्मी महिला पापड उद्योगावर युध्दाचा परिणाम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

सोलापूर शहरातील लक्ष्मी-विष्णू चाळीत महालक्ष्मी महिला पापड उद्योगाला युद्धाचा फटका बसला असून, या महिलांनी निर्माण केलेला तब्बल ८४ टन म्हणजेच २ कोटीचा पापड सध्या आखाती भागात निर्यात होत नसल्याने गोडावूनमध्ये पडून आहे. सध्याही रोज ६ टन पापडाचे उत्पन्न चालू असून, युध्द नाही थांबले तर मात्र हा उद्योग संकटात येण्याची भीती महालक्ष्मी उद्योगाचे मालक राजाभाऊ डोंगरे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना आज (दि. १३) व्यक्त केली.



व्यवसाय करण्याचे ठरवल्यावर अनेकदा व्यवसायात अडचणी येतात. काही जणांना तोटाही होतो आणि त्यामुळे मनात नकारात्मकता येते. मात्र, या सर्वांवर मात करून राजाभाऊ डोंगरे आणि त्यांच्या मातोश्री संपदा डोंगरे यांनी मोठ्या धाडसाने अवघ्या ४ महिलांवर चालू केलेल्या या व्यवसायात आता तब्बल ६ हजारापर्यंत महिलांना काम मिळते आहे. पापड उद्योगातील या यशामुळे डोंगरे परिवाराचे नाव साता समुद्रापार गेले आहे. डोंगरे यांच्या यशस्वी प्रयोगामुळे दरमहा महालक्ष्मी पापड उद्योग केंद्रातून १२५ टन पापड निर्मिती होते. डोंगरे यांच्या पापडला दुबई, कुवेत, इराण, इराक, सौदी अरेबिया, अमेरिका आदींसह इतरही काही देशात मागणी आहे. ही मागणी मोठी असल्याने त्यांनी महिला कामगार वर्गही वाढविला आहे. सोलापूर शहरातील त्यांच्या विविध केंद्रातून तब्बल ६ टन पापडाची रोजच निर्मिती होती. डोंगरे यांच्यामुळे हजारो महिलांना रोजगारही मिळाला आहे. सध्या आखाती भागात युध्द चालू असल्याने त्यांच्या महालक्ष्मी महिला पापड उद्योगाला मोठा फटका बसलाय. तब्बल २ कोटी रुपयांचे पापड युद्धजन्य परिस्थितीमुळे गोडाऊनमध्येच पडून आहेत. सध्या निर्यात बंद झाल्यानें पापड उद्योग मोठ्या संकटात सापडलाय.



डी मार्ट आणि देशातील मोठ्या हॉटेल्सलाही त्यांचे पापड जातात मात्र उत्पन्न मोठे असल्याने विदेशात निर्यात केल्याशिवाय त्यांना पर्यात नसल्याचेही डोंगरे यांनी सांगितले. एकंदरीत, पापड उद्योगाप्रमाणे हॉटेल व्यावसायिक आणि इतरही काही लघुउद्योगांना या युध्दाचा फटका बसत आहे.

### घाबरू नका मी तुमच्या पाठीशीः आ. देवेंद्र कोठे

शहर मध्य मतदारसंघातील पापड उद्योगाची ही वार्ता आ. देवेंद्र कोठे यांना समजताच त्यांनी पापड उद्योजक राजाभाऊ डोंगरे यांच्याशी थेट संपर्क केला आणि सांगितले की, सध्या युध्दजन्य स्थितीमुळे आपला माल थांबला असला तरी आपण घाबरू नये. त्यासाठी काही ना काही मार्ग काढू, इतकेच नाहीतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यामार्फत इतर देशात या पापडाला आपण मार्केट मिळवून देवू; अशी ग्वाही आमदार देवेंद्र कोठे यांनी दिली असल्याची माहिती डोंगरे यांनी दिली.

### युध्द नाही थांबल्यास आम्हीही आर्थिक अडचणीत येवू

दरम्यान, याबाबत पापड बनविणाऱ्या काही महिलांशी दैनिक तरूण भारतच्या माध्यमातून संवाद साधल्यावर त्यांनी सांगितले की, महालक्ष्मी पापड उद्योगामुळे आमच्या हाताला काम मिळाले असून, आम्ही आमच्या पायावर सक्षमपणे उभ्या आहोत. युध्द असेच चालू राहिले तर हा उद्योग संकटात येवून पुन्हा आम्हाला बेरोजगारीचे जीवन जगावे लागेल आणि यामुळे आम्ही आर्थिक अडचणीत येवू, अशी खंत व्यक्त केली.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १३८२

**परी हें तरीच घडे । जरी संयमाचीं अखंडें ।**
**सर्वद्वारीं कवाडें । कळासती ।।**

ज्ञानी पुरुष आप-पर भेद जाणत नाही. आपण आणि ब्रम्ह कांही वेगळे नाही अशी ज्ञानी व्यक्तीची खात्री पटते. विस्तवाला जशी वाळवी लागत नाही. तसे ज्ञानी व्यक्तिच्या मनाला सुख, दु:ख, आपला, परका, स्वार्थ, मोह असे कांही चिटकत नाही. प्रकाशाच्या ठिकाणी अंधाराचा प्रवेश होत नाही, तसे ज्ञानी व्यक्ति आत्मज्ञानाने प्रकाशमान झाला असल्याने त्याच्या ठिकाणी मोहाचा, मीपणाचा अंधार प्रवेश करीत नाही. अष्टांग योगाने कुंडलिनीच्या माध्यमातून तो ब्रम्हाशी एकरुप होतो. मरणाची भीती न बाळगण्याची, आप-पर भेद न जाणण्याची, मोहात न अडकण्याची स्थिती तेव्हाच होते जेव्हा तो इंद्रियांना आपल्या ताब्यात ठेवतो. हे सांगतांना भगवंत म्हणाले, परी हें तरीच घडे । जरी संयमाचीं अखंडें । सर्वद्वारीं कवाडें । कळासती ।। अर्थात, एवढी योगसाधना तेव्हाच घडते, जेव्हा व्यक्ति इंद्रियरुपी दारांना निग्रहाची कवाडे अखंड लावून टाकतो.



इंद्रिय निग्रह झाला तर माणसाचे चित्त आपोआप स्थिर होऊ लागते. ज्ञान ग्रहणासाठी चित्त स्थिर होणे अत्यंत आवश्यक असते. चित्ताची स्थिरता हीच ज्ञान ग्रहणाचा आधारस्तंभ म्हटले तर चुकीचे होणार नाही. विषयासक्ती मुळे, इंद्रियांच्या लाडामुळे मानवाच्या हातून नको ते घडत असते. नको ते विचार डोक्यात घोळत असतात. त्यामुळे मन सतत बाहेर धांवत असते. विषयांना तिलांजली देऊन, मन:प्रवृत्तीला बेडी घालुन, परब्रम्हाला अंत:करणात साठवून ज्ञानी लोक आत्मानुभव घेत असतात. असे ज्ञानी लोक सदैव आत्म सुखात राहतात. ज्ञानी, जिवंतपणीही या देहाबद्यल आसक्ती बाळगत नाहीत, आणि मृत्यू समयीही आसक्ती बाळगत नाहीत. त्यामुळे त्यांना या देहाच्या सुख-दु:खाचा सामान्या प्रमाणे अनुभव येत नाही. या देहाला मी- मी म्हणणा-यांनाच सुख, दु:ख आप-पर जाणवत असते. काम क्रोधांचे ताट देहासक्ती असणा-यांसाठी वाढले जाते, ज्ञानी पुरुषांसाठी नाही. हे लक्षात येते की, योगधारणा, योगसाधना करण्यासाठी मन स्थिर असलेच पाहिजे. मनाच्या स्थिरतेसाठी विषयाची ओढ सोडली पाहिजे. ज्ञानप्राप्तीसाठी योगसाधनेची गरज आहे. अभ्यास करण्यासाठी मन एकाग्र होणे आवश्यक असते. मन जर भटकत असेल तर वाचलेले ध्यानात राहणे अवघड असते. विद्यार्थी जीवनात अभ्यासासाठी मनाची एकाग्रता होणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थी जीवन जर मनाच्या मागे धावण्यात किंवा इंद्रियांचे लाड पुरविण्यात गेले तर भविष्य अंधारकारमय होणार यांत शंका नाही. आपले जीवन प्रकाशमय होण्यासाठी नको त्या गोष्टीचा विचार सोडून, आपल्या ध्येय्यपूर्तीसाठी जे आवश्यक आहे., त्याचा ध्यास धरुन प्रयास करणे आवश्यक असते. मनाची एकाग्रता करणे अवघड काम नाही. आपल्या मनाला आपणच धावू देत असतो, त्यामुळे त्याच्यावर बंधनसुध्दा आपणच घातले पाहिजे. मनुष्य हा आयुष्यभर विद्यार्थी असतो. त्यामुळे ज्ञानप्राप्तीसाठी, आत्मसुखासाठी आपण इंद्रिय निग्रह करुन विषयासक्ती सोडण्याचा प्रयत्न करायला हवा. या प्रयत्नामुळे दु:ख, चिंता, मोह, स्वार्थ, कामासक्ती आपोआप दुर होऊ लागते. आपल्या सर्वांच्या आनंदी जीवनासाठी या सर्वांना दुर करण्याची नितांत गरज आहे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# कुटुंबाच्या सहकार्यानेच स्त्रीचे जीवन फुलते : कल्पना कस्तुरे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

प्रत्येक घरातील महिला,आपले घर सांभाळून नोकरी व व्यवसाय निमित्ताने समाजात मिळून मिसळून काम करीत आहे. त्यांच्या मागे पुरुष मंडळी भक्कमपणे उभी आहे. कुटुंबातील सदस्यांच्या सहकार्यानेच या स्त्रीचे जीवन फुलते हे मान्यच करावे लागेल, असे प्रतिपादन कल्पना कस्तुरे यांनी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिनानिमित्त जैनस्कोच्या वतीने आयोजित ज्येष्ठ व कर्तृत्ववान महिलांच्या सत्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. संस्थाध्यक्ष सुभाष लुणावत व कार्याध्यक्ष केतन शहा यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित या कार्यक्रमात, अजितकुमार शहा-भूमकर, अरुणकुमार धुमाळ, सुनील गांधी (हरिभाई देवकरण), अभिनंदन विभूते, यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

जयश्री लुणावत व रेवती शहा यांच्या णमोकार महामंत्र गायनानंतर, मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. मनीषा शहा यांनी सर्वांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले. अरुणकुमार धुमाळ यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नंदकुमार कंगळे, अजित शहा-भूमकर, महावीर सांस्कृतिक भवनचे सर्व विश्वस्त, कर्मचारी, जैनस्को परिवाराने परिश्रम घेतले.



# विविध उपक्रमांनी प्रिसिजनमध्ये सुरक्षा सप्ताह साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह २०२६ निमित्त प्रिसिजन कंपनीत ४ ते १० मार्च दरम्यान ५५ वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. सुरक्षितता वाढविण्यासाठी लोकांचा सहभाग, शिक्षण आणि सक्षमता या वर्षीच्या थीमनुसार कंपनीत आठवडाभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी कंपनीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुरक्षा शपथ घेऊन काम करताना सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची प्रतिज्ञा केली. कंपनीचे सुरक्षा व्यवस्थापक सुहास पाटील यांनी कर्मचाऱ्यांना औद्योगिक सुरक्षितता, आरोग्य व पर्यावरण संरक्षण याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.अमित पाटील यांनी सुरक्षा विषयक माहिती तसेच राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे उद्दिष्ट याबाबत माहिती दिली. एचआर विभागाचे सरव्यवस्थापक राजकुमार काशीद यांनी सुरक्षित कामकाजाची सवय ही उद्योगाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले.

सुरक्षा घोषवाक्य स्पर्धा, सुरक्षा पोस्टर स्पर्धा, सुरक्षा कविता स्पर्धा, सुरक्षा विषयक प्रश्नमंजूषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. कामाच्या ठिकाणी सुरक्षा साधनांचा वापर आणि निष्काळजीपणामुळे होणाऱ्या अपघातांचे परिणाम याविषयी लघुनाटिका सादर करण्यात आली.

# उत्तरच्या ९ महसूल मंडळात महाराजस्व समाधान शिबीर उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील १८ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये उत्तर सोलापूर तालुक्यामधील एकूण ९ महसूल मंडळांमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. १ ची अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्देश शासनाने दिलेले आहेत.

यामध्ये तिऱ्हे व कोंडी येथे शनिवार, दि. ७ मार्च २०२६ राबविण्यात आले आहे. दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी वडाळा येथे महाराष्ट्र राज्य विधी सेवा शिबीर घेण्यात आले असल्याने शनिवार दि. दि. १४ मार्च २०२६ रोजी समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते; दरम्यान, वडाळा येथील शिबीर हे रद्द करण्यात येऊन सदरचे शिबीर शुक्रवार दि. १७ एप्रिल २०२६ रोजी घेणेत येत आहे. तर बाळे व शेळगी येथे शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६, सोरेगाव व वडाळा शुक्रवार दि. १७ एप्रिल २०२६ घेण्यात येणार आहे. तर महानगरपालिका ठिकाणी असलेल्या मंडळात सोलापूर - शुक्रवार, दि. ८ मे २०२६, मजरेवाडी - शुक्रवार १५ मे २०२६ हे शिबीर घेण्यात येणार आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानात विविध प्रकारचे महसूली दाखले, पुरवठा कार्यालयाशी संबंधित दाखले, इतर विभागांशी संबंधित योजना व दाखले यांची सुविधा सदर शिबीरात तात्काळ पुरवली जाणार आहे.

त्या अनुषंगाने आपण आपल्या कागदपत्रांची पुर्तता संबंधित विभागात करावी. तसेच तालुका प्रशासनाकडून जाहीर आवाहन करण्यात येते की, सर्व नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांनी संबंधित विभाग व तहसिल कार्यालयाशी संपर्क साधावा, असे तहसिलदार उत्तर सोलापूर निलेश पाटील यांनी कळविले आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार,
दि. १४ मार्च २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - फाल्गुन कृ. दशमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- उत्तराषाढा (२८.४८)
योग - वरियान (१०.४१)
करण - बव (२०.४८)
राहू काल : शनिवार
शनिवार : दु. १.३० ते ३.००

दिनविशेष :
२०१०: ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या हस्ते संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांना पुणे येथे 'पुण्यभूषण' पुरस्कार प्रदान.
२००१: भारतीय क्रिकेटर व्ही. व्ही. एस. लक्ष्मणने ईडन गार्डनवर नाबाद २७५ धावा काढून सर्वोच्च धावांचा विक्रम मोडला.

# दररोजच्या प्रवासाने यशस्वी झाली चौफेर पत्रकारितेची चाळीशी

## ऋषितुल्य पत्रकार नारायण कारंजकर यांचा अमृतमहोत्सव

*महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाचे माजी उपाध्यक्ष, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व सोलापूर तरुण भारतचे माजी संपादक, ज्योतिष भास्कर श्री.नारायण जगन्नाथ कारंजकर यांनी वयाच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे,त्याबद्दल त्यांचा सोलापूर तरुण भारत माजी कर्मचारी समितीच्यावतीने सत्कार करण्यात येणार आहे,त्यानिमित त्यांच्या वाटचालीवर टाकण्यात आलेला हा एक प्रकाशझोत.*

ऋषितुल्य असलेल्या गुरुवर्य श्री.कारंजकर यांनी आपल्या आयुष्याचा निम्म्यापेक्षा अधिक काळ पत्रकारितेत व्यतीत केला आहे. सारे आयुष्य त्यांनी पत्रकारितेत घालविले, जवळपास चाळीस वर्षे त्यांनी पत्रकारितेबरोबर ज्योतिषी व आयुर्वेदात भरभरून व झोकून देऊन काम केले. आध्यात्मिक व धार्मिक लिखाणात त्यांचा हातखंडा होत आणि आहे. त्यामुळे सोलापूर शहर जिल्ह्याच्या पत्रकारितेत त्यांनी वेगळा ठसा उमटविला असून त्यांचे पत्रकारितेतील योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते व ते नवीन पिढीला मार्गदर्शक, प्रेरणादायी ठरले, ठरत आहे. अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेले श्री.कारंजकर हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील कुर्डुवाडी येथील रहिवासी पण त्यांची सारी पत्रकारिता सोलापुरातच रुजली, फुलली आणि बहरली. सुमारे चाळीस वर्षे त्यांनी दररोज कुर्डुवाडी-सोलापूर -कुर्डुवाडी हा ८० किलोमीटरचा प्रवास करुन चौफेर पत्रकारितेसाठी योगदान दिले. १ फेब्रुवारी १९५१ हा श्री. कारंजकर यांचा जन्मदिवस.ते कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापिठाचे विद्यार्थी. त्यांनी१९७२ ला बी.कॉम तर१९७४ ला बी.ए.चे शिक्षण पूर्ण केले. बार्शी येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे या संस्थेच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेत १९७५ साली त्यांच्याकडे संस्थेच्या जीवनसंग्राम या साप्ताहिकाची जबाबदारी आली, तेव्हापासूनच त्यांच्या पत्रकारितेस सुरुवात असे म्हणावी लागेल. त्याचवेळेस त्यांना वडिलांच्या आग्रहाखातर पुणे जिल्ह्यातील शासकीय आश्रम शाळेवर नोकरी पत्करावी लागली.तेथे मन फार रमले नाही.त्यांना पत्रकारितेची विशेष ओढ होतीच,



त्यामुळेच की काय, त्यांनी एका वर्षानंतर १९७६ ला दैनिक सोलापूर समाचारमध्ये सेवा सुरू केली.तेव्हापासून सलग चाळीस वर्षे त्यांच्या पत्रकारितेचा यज्ञ चालू राहिला. समृद्ध जीवन जगणारे श्री. कारंजकर हे कुटुंबवत्सल आहेत.आजच्या स्थितीत ते स्वत:ला धन्य समजतात. त्यांनी चाळीस वर्षे कुर्डुवाडी सोलापूर कुर्डुवाडी असा प्रवास करून आपल्या चौफेर पत्रकारितेची कारकीर्द यश यशस्वी केली आहे. या साऱ्या प्रवासात त्यांना पत्नी सौ.सुमतीदेवी यांनी साथ दिली आहे. थोरला मुलगा महेश हा एम.ई.झाला असून तो तुळजापूर इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये असिस्टंट प्रोफेसर तर धाकटा अविनाश हा ज्योतिष विशारद असून हेडक कंपनीत सुपरवायझर आहे,विशेष म्हणजे त्यांच्या दोन्ही सुना शिल्पा व सारिका ह्या पदवीधर आहेत आणि मुलगी शुभदा ही बी फॉर्म झालेली आहे. त्यांच्यासोबत पाच नातवंडे, तीन बहिणी व बंधू आहेत. त्यांना यापुढे वयाची शंभरी गाठण्यासाठी व अधिक कार्य करण्यासाठी चांगले आरोग्य लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना. शुभेच्छुक,

**- दशरथ वडतिले,**
माजी अध्यक्ष, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, मो.९४२२४५७१००

### उपमहापौरांच्या हस्तक्षेपामुळे वृक्षतोड थांबली; कारवाईची मागणी

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

शहरातील योगी राजेंद्र नगर परिसरातील माशाळ वस्ती येथे मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू असल्याची माहिती मिळताच सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांच्या हस्तक्षेपामुळे सुरू असलेली वृक्षतोड तात्काळ थांबवण्यात आली.

तेथे मशीनच्या सहाय्याने झाडे तोडण्याचे काम सुरू असल्याचे आढळून आले. यावेळी त्यांनी संबंधितांना कडक शब्दांत जाब विचारत वृक्षतोड त्वरित बंद करण्याचे आदेश दिले. संबंधित अधिकाऱ्यांना संबंधित मशीन जप्त करण्याबाबत तसेच वृक्षतोडीत सहभागी असलेल्या संबंधित व्यक्ती, ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून शहरातील मोकळ्या जागांमधील झाडांचे संरक्षण करण्यासाठी महापालिकेने अधिक कठोर पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.


# खेळाडूंना आता घरबसल्या 'क्रीडा ई-प्रमाणपत्र'

## आगामी शासकीय भरतीसाठी अनिवार्य

राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५% आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने 'क्रीडा ई-प्रमाण' ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली असून यामुळे आता खेळाडूंना प्रमाणपत्र पडताळणीसाठी क्रीडा कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत

या प्रणालीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही प्रणाली ब्लॉकचेन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित आहे. यामुळे यामध्ये कोणताही मानवी हस्तक्षेप किंवा फेरफार करणे शक्य नाही, परिणामी बोगस प्रमाणपत्रांना पूर्णपणे आळा बसेल. खेळाडूने माहिती भरल्यानंतर ती मूळ डेटाशी जुळल्यास, अवघ्या २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होतो. प्रत्येक प्रमाणपत्रावर एक अद्वितीय QR कोड असेल. नियुक्ती प्राधिकारी (उदा. MPSC, पोलीस भरती) हा कोड स्कॅन करून प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पडताळू शकतील.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता या 'क्रीडा ई-प्रमाणपत्राची' प्रत जोडणे अनिवार्य आहे. या प्रमाणपत्रा शिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा विचार केला जाणार नाही. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणपत्र पडताळणी केली आहे, त्यांनाही आता नवीन भरतीसाठी या प्रणालीद्वारे नवीन प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.




खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन नोंदणी पूर्ण करावी. नोंदणीसाठी आधार-संलग्न मोबाईल क्रमांक आणि आयडी, दैनंदिन वापरातील स्वतःचा ई-मेल आयडी, आधार कार्ड (PDF फॉरमॅटमध्ये), क्रीडा स्पर्धेत प्राप्त केलेले प्राविण्य प्रमाणपत्र जोडावे.

सध्या कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (२०२५), ज्युडो (२०२४) आणि कुराश (२०१७-१८ व २०२४-२५) या स्पर्धांचे अभिलेख ऑनलाइन उपलब्ध आहेत. अन्य खेळांचेही अभिलेख क्रीडा खात्याने लवकरात अपलोड करावेत. जेणेकरून या खेळाडूंना ही प्रमाणपत्रे मिळण्यास अडचण होणार नाही. खेळाडूंनी नियमितपणे संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन क्रीडा युवक सेवा संचालनालयाने केले आहे

### नोंदणी कशी करावी?

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in/या संकेतस्थळावर सर्वात खाली 'सेवा' (Our Services) विभागातील '५% Reservation' या टॅबवर क्लिक करून आपली 'एक वेळ नोंदणी' (One Time Registration) पूर्ण करावी.





स्ट्रेट ड्राईव्ह
अजितकुमार संगवे
मो.9881133103

ज्या खेळाडूंची माहिती किंवा प्रमाणपत्रे तांत्रिक कारणास्तव प्रणालीवर दिसत नसतील, त्यांनी supportkridaepramaan.org या ई-मेलवर आपली तक्रार नोंदवावी. ई-मेलमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धेचे अचूक नाव व वर्ष आणि मूळ क्रीडा प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत जोडणे आवश्यक आहे.

### शासकीय भरतीसाठी पात्र आहेत हे ६० खेळ

आर्चरी, ॲथलेटीक्स, जलतरण (स्विमींग, डायव्हींग, वॉटरपोलो), बॅडमिंटन, बास्केटबॉल, बॉक्सींग, बोलींग, कनोईंग (स्प्रीन्ट, स्लालोम, ट्रेडीशनल बोट रेस), सायकलींग (रोड,बिएमएस, मौंटनरींग, ट्रॅक), बुध्दीबळ (चेस), फेन्सींग, फील्ड हॉकी (हॉकी), फुटबॉल, जिम्नॅस्टींक्स (आर्टीस्टींक्स, रिदमीक, ट्रॅम्पोलीन), हॅण्डबॉल, ज्युदो, कबड्डी, खो-खो, मॉडर्न पेन्टॅथलॉन, मार्शल आर्ट (वुशू), नेटबॉल, रोईंग, रग्बी सेवन, शुटींग, स्कॅश, सॉफ्टबॉल, टेबल टेनिस, तायक्वांदो, टेनीस, ट्रायथलॉन, व्हॉलीबॉल, वेटलिफ्टींग, रेसलींग (फ्रीस्टाईल, ग्रीकोरोमन), आईस हॉकी, मल्लखांब, सेपक टकरा, सॉफ्ट टेनिस, बेसबॉल, कॉन्ट्रक्ट ब्रीज, क्रिकेट, लॉन बॉल्स, मार्शल आर्ट (ज्युजुस्तू), मार्शल आर्ट (कुराश), मार्शल आर्ट (पीनाक सीलाट), मार्शल आर्ट सॅम्बो, पॅराग्लायडींग, मॅकॅनिकल स्पोर्टस (जेटस्की), सेलींग, बीच व्हॉलीबॉल, बॉडी बिल्डींग, कॉन्ट्रक्ट ब्रीज, क्यु स्पोर्टस, डान्स स्पोर्ट, ड्रगन बोट, रोलर स्पोट, स्पोर्टस क्लायबींग, सींक्रोनाईज्ड स्वीमींग, गोल्फ, इक्वेस्टेरीयन, कराटे.

# वटवृक्ष मंदिर आता पहाटे २ ते रात्री १२ पर्यंत राहणार खुले


## स्वामी समर्थ प्रकट दिन व हिंदू नववर्षानिमित्त दर्शनासाठी वेळ वाढवली; प्रशासनाकडून विशेष सुविधा

**तभा वृत्तसेवा**

**अक्कलकोट, दि. १३ मार्च-**

गुढी पाडवा हिंदू नववर्ष आरंभ, स्वामी समर्थ प्रकट दिन, रमजान ईद, साप्ताहिक सुट्टी निमित्ताने येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे श्री स्वामी भक्तांसाठी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाकरीता गुरुवार दिनांक १९ मार्च ते रविवार दिनांक २२ मार्च अखेर पहाटे २ ते रात्री १२ वाजेपर्यंत खुले ठेवण्यात येणार असल्याची माहिती मंदीर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली.

गुरुवार दि.१९ रोजी हिंदू नववर्ष आरंभ म्हणजेच गुढी पाडवा, शुक्रवार दिनांक २० मार्च रोजी श्री.स्वामी समर्थांचे प्रकटदीन, शनिवार दिनांक २१ मार्च रोजी रमजान ईदची सुट्टी, रविवार दिनांक २२ मार्च रोजी साप्ताहीक सुट्टी इत्यादी सलग सुट्टया, सणवार व श्री स्वामी प्रकट दीन उत्सव असल्याने सर्व स्वामी भक्तांना सुलभ स्वामी दर्शनाचा लाभ व्हावा यामुळे मंदीर समितीच्या वतीने हा निर्णय घेण्यात आला असल्याचे स्पष्टीकरणही महेश इंगळे यांनी या प्रसंगी केले आहे. पुढे बोलताना चेअरमन महेश इंगळे यांनी वरील कालावधीत सर्व स्वामी भक्तांना




सुलभ स्वामी दर्शन व्हावे या हेतुने मंदीरात भाविकांच्या वतीने स्वामींना नित्यनियमाने होणारे अभिषेक ही बंद ठेवण्यात येतील. जे स्वामी भक्त अभिषेकाची पावती करतील त्यांना अंगारा प्रसाद मिळेल व त्यांचा नंतर संकल्प सोडला जाईल.

> दि.२० मार्च रोजी श्री.स्वामी प्रकट दिनानिमीत्त भजन, पाळणा, आरती, प्रसाद वाटप व महाप्रसाद वाटप इत्यादी कार्यक्रम संपन्न होतील. तत्पुर्वी पहाटे ४ च्या काकड आरती नंतर नगर प्रदक्षिणेस (प्रभात फेरीस) प्रारंभ होईल. दिनांक १९ मार्च ते दि.२२ मार्च अखेर भाविकांची होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता मंदीर समितीच्या वतीने मंदीर व परिसरात महिला व पुरुष भाविकांसाठी स्वतंत्र दर्शन रांग, दर्शन रांगेत कापडी मंडप, ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय, सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त, अग्नीशमन यंत्रणा, मंदीरात कुलर व फॅनची व्यवस्था, व्हीलचेअरची व्यवस्था, प्रथमोपचार व्यवस्था इत्यादीचे नियोजन करण्यात आले आहे.

दि.१९ मार्च रोजी गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर श्री स्वामी समर्थांच्या १४८ व्या पुण्यतिथी महोत्सवाच्या कार्यक्रम पत्रिकेचे पुजन काकड आरती पुर्वी संपन्न होईल.

---

### महत्वाचे...



## घर जळून झाले खाक; कोगनूरेंनी धीर देत केली मदत

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

आहेरवाडी येथील इरेश भागण्णा बोरूटे यांच्या घराला मंगळवारी सकाळी अचानक शॉक सर्किटमुळे भीषण आग लागून संपूर्ण घर जळून खाक झाले होते. घटनेची माहिती मिळताच अतिथी प्युअर व्हेज, कुंभारी तथा एम. के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत बोरूटे कुटुंबीयांची भेट घेतली, त्यांना धीर दिला आणि मदतीचा हात पुढे केला. या आगीत सोने-चांदी, रोख रक्कम व संसारोपयोगी साहित्य जळून सुमारे दीड ते दोन लाखांचे नुकसान झाले आहे. बोरूटे कुटुंब अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारे कुटुंब आहे. त्यांच्या आयुष्यात अचानक आलेल्या या कठीण प्रसंगी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन या कुटुंबाला सढळ हाताने सहकार्य करावे, अशी विनंती जनसेवक महादेव कोगनुरे यांनी केली.

---

## सरकारी कामात अडथळा प्रकरणी कृषी पर्यवेक्षक निर्दोष

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

कार्यरत असलेले कृषि सहाय्यक व सेवानिवृत्त कृषि पर्यवेक्षक बुरगुटे यांची सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपी सुदर्शन गणपत बुरगुटे, वय ३०, कृषि सहाय्यक, कृषि विभाग महाराष्ट्र राज्य शासन येथे कार्यरत आहेत व त्यांचे वडिल बिभिषण गणपत बुरगुटे वय ६०, सेवानिवृत्त हे कृषि पर्यवेक्षक म्हणून कार्यरत होते. दोघेही रा. उपळे (दु), ता. बार्शी यांची मे. अतिरिक्त सत्र न्यायाधिश, बार्शी यांनी फिर्यादीच्या सरकारी कामात अडथळा आणला व मारहाण केली या आरोपातून निर्दोष मुक्तता केली. यातील फिर्यादी नरसु नाना मते, वय ५८, रा. झाडी, ता. बार्शी हे ता.०५/०९/२०१५ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ खात्यामध्ये उपळे (दु) शाखेत सेक्शन ऑफिसमध्ये असिस्टंट लाईनमन म्हणून काम करीत होते. राज्य विद्युत मंडळाचे वरिष्ठ अधिकारी जाधव साहेब यांनी हिंगणी तलाव येथे पाण्यासाठी राखीव कोटा केला आहे व तेथे असलेल्या शेतीपंपाचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याचे आदेश दिले. त्यावेळी आरोपीच्या खाजगी विहीरीवरील पंपावरील विद्युत पुरवठा खंडीत केला. त्याबाबत फिर्यादीला ता.०५/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. उपळे (दु) स्टॅन्डवरती दोन्ही आरोपीनी जाब विचारला व विद्युत पुरवठा खंडीत का केला? कनेक्शन जोडून दे, असे म्हणून आरोपीने हाताने व लाथाने फिर्यादीस मारहाण केली म्हणून फिर्यादीने फिर्याद दाखल केली होती. सदर खटल्याची सुनावणी अतिरीक्त सत्र न्यायाधिश बार्शी येथे होऊन आरोपीतर्फे अॅड. भारत कट्टे यांनी युक्तिवाद केला की, महाराष्ट्र शासनाने हिंगणी तलावाबाबत केलेला आदेश सादर केला नाही, तसेच वरिष्ठ अधिकारी जाधव साहेब यांचा जबाब नोंद केला नाही, मारहाण केलेबाबत डॉ. काळोखे यांची साक्ष नोंद केली नाही. तसेच मारहाण केली त्या ठिकाणाचे प्रत्यक्ष साक्षीदारांचे जबाब मे. कोर्टात नोंद केले नाहीत, फिर्यादी हा सरकारी ड्युटीवर होता याबाबत कागदोपत्री पुरावा हजर केला नाही. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरुन मे. कोर्टाने दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यात आरोपीतर्फे अॅड. भारत कट्टे, अॅड. गणेश जगताप (बार्शी), अॅड. राही पवार (सोलापूर) यांनी काम पाहिले.

---

## आशा विद्यालयात महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. १३ मार्च**

नीलम नगर भाग ३ व ४ येथील रणजितसिंह मोहिते-पाटील बालक मंदिर, आशा मराठी विद्यालय व श्री धर्मण्णा सादूल प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका आफरीन सय्यद होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका तस्लीम पठाण, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका सारिका खजूरगी, कविता गड्डम, अखिला भागानगरे, समाजसेविका रुपाली कोळी, संस्थेचे अध्यक्ष आसिफ पठाण यांच्या प्रमुख उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. सूत्रसंचालन सय्यद तबस्सुम यांनी केले तर आभार स्वप्नाली जाधव यांनी मानले.

---



## अजनाळे येथे सर्वरोग निदान शिबीर

**सांगोला,दि.१३ मार्च-**

महिला दिनाचे औचित्य साधून सचिन धांडोरे मित्र परिवार व डॉ. खंडागळे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने अजनाळे येथे सर्वरोग निदान व मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन सरपंच दिपाली लाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी डॉ.स्वाती खंडागळे, डॉ.दीपांकर चंद्रकापुरे, डॉ. शेखर जवळगे, डॉ. बसवराज बिराजदार, प्रल्हाद येलपले, संदिप सरगर, हणमंत येलपले, आरोग्य सेविका सिंधु गडदे, पल्लवी धांडोरे, ज्योती येलपले, सारिका आवटे, रंजना येलपले, पूजा पोतदार, महेश चव्हाण, प्रशांत बनसोडे, सुनिल धांडोरे, संजय येलपले, महेश धांडोरे, सोमनाथ धांडोरे, संदिप पाटील उपस्थित होते. शिबिराला गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी २०० रुग्णांची विविध आजारांसाठी तपासणी करून मोफत औषधोपचार देऊन गरजू रुग्णांसाठी मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करण्यात आली. शिबिर यशस्वी करण्यासाठी समाधान धांडोरे, सुदर्शन वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

---

# मोडनिंब येथे ६० युवकांकडून श्लोक वाचन

### छत्रपती श्री संभाजी महाराज बलिदान मासनिमित्त आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**

**मोडनिंब, दि. १३ मार्च-**

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज बलिदान मास निमित्त मोडनिंब (ता.माढा) सकल हिंदू समाजाच्या वतीने येथे १८ फेब्रुवारी ते १८ मार्च, फाल्गुन शुद्ध प्रतिपदा ते फाल्गुन अमावस्यापर्यंत धर्मवीर बलिदान मास साजरा करून छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे स्मरण व आदरांजली वाहिली जात आहे.

बलिदान मासात रोज सायंकाळी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व स्मरण करण्यात येणार आहे. युवकांनी सामूहिक मुंडण करून संभाजी महाराज यांना आदरांजली वाहिली आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचा धगधगता इतिहास आहे . छत्रपती श्री संभाजी महाराज मृत्युच्या दिशेने बलिदानाच्या मार्गावर पूर्ण महिनाभर अति धीरोदत्तपणे देहत्याग करीत होते. त्यामुळेच छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान, त्यांनी सहन केलेल्या मरणयातना याची प्रत्येक हिंदू मनाला जाणीव होण्यासाठीच समस्त शिवशंभू पाईकांकडून हा बलिदान मास पाळण्यात येत आहे.



> **श्री संभाजी सूर्यहृदय श्लोकाचे वाचन**
>
> छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर ग्रामपंचायत कार्यालया समोरील प्रांगणात जवळपास दररोज ६० ते ७० युवक नित्यनियमाने उपस्थीत असतात.कार्यक्रमाची सुरवातीस प्रेरणा मंत्र म्हटला जातो. श्री संभाजी सूर्यहृदय श्लोकाचे वाचन करून, अर्थ सांगितला जातो. ध्येय मंत्र व प्रतिज्ञेने सांगता होते.

> **असा पाळला जातोय बलिदान मास**
>
> लहानासह युवकांपैकी अनेकांनी वेगवेगळ्या प्रकारे बलिदान मास पाळण्याचा नियम केला आहे. यामध्ये काही तरुणांनी दिवसातून एक वेळा जेवण करणे, काहींनी चप्पल वापरणे बंद केले, काहींनी मुंडण केले, काही युवकांनी मिष्ठान्न तसेच गोड खाणे तर काहींनी मांसाहार बंद केला आहे.

---



# नारायणचिंचोलीत रंगला खेळ पैठणीचा

### ज्येष्ठ मातांचा केला गौरव; आरोग्य विषयक जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**

**पंढरपूर, दि.१३ मार्च -**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पंचायत समिती पंढरपूरचे गटविकास अधिकारी अमोल जाधव व सहाय्यक गटविकास अधिकारी अरुण भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील नारायणचिंचोली ग्रामपंचातीच्या वतीने मंगळवारी (दि.१० मार्च) विविध विधायक उपक्रमाचे, खेळ पैठणीचा व मनोरंजनाचे तसेच प्रबोधात्मक आरोग्य विषयक जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महिला दिनानिमित्त मंगळवारी नारायण चिंचोली येथे महिला सक्षमीकरण या विषयावर यशदा संस्थेच्या विशेष ट्रेनर ज्योतीताई पाटील यांच्या व्याख्यानाने श्रोते मंत्रमुग्ध झाले. वैद्यकीय अधिकारी डॉक्टर मेघा भानुसे यांच्या वैद्यकीय टीमने उपस्थित महिलांची कर्करोग तपासणी, बीपी शुगर ऍनिमिया हिमोग्लोबिन दंतरोग तपासणीचे शिबिर आयोजित केले होते.यामध्ये अनेक महिलांचे समुपदेशन करून योग्य औषधोपचार करण्यात आला.तसेच यावेळी गावातील सदृढ बालक माता, जेष्ठ महिला,आदर्श मतांचा सत्कार तसेच लेक लाडकी योजनेतील लाभार्थी महिलांचा, व ग्राम प्रशासन चालवणाऱ्या सर्वच शासकीय महिला अधिकारी कर्मचारी यांचा सन्मान तालुका वैद्यकीय अधीकारी डॉ. एकनाथ बोधले, सरपंच नर्मदा धनवडे व उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण यांच्या हस्ते करणेत आला. विठाई महिला ग्रामसंघ या महिला बचत गट कार्यालयाचे उदघाटन करून शोभा आहेर यांच्याकडे ताबा देण्यात आला आले.

महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम होम मिनिस्टर खेळ पैठणीचा आयोजन करण्यात आले. सादरकर्ते शहाजी देशमुख यांचे बहारदार सादरीकरण, गुंडीबा कांबळे यांचे नियोजन आणि महिलांचा उत्साह यामुळे नारायण चिंचोली येथे माता - भगिनींचा उत्साह ओसंडून वहात असल्याचे दिसून आले. यात विजेत्या स्पर्धकास प्रथम पारितोषिक म्हणून पैठणी केतकी धनवडे यांचेकडून, द्वितीय पारितोषिक सोन्याची नथ शाही गोल्ड दामोदर मार्केट पंढरपूरचे उद्धव बाबर यांच्यावतीने, तर तृतीय पारितोषिक मिक्सर गावचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष विजय कोळेकर यांच्याकडून देण्यात आले. याशिवाय उपस्थित सर्वच महिलांना ग्रामपंचायतीच्या वतीने पोळी डबा सप्रेम भेट देण्यात आला. तर राजे ग्रुप ४९९ चे अध्यक्ष विठ्ठल माने यांनी उपस्थित सर्वच महिलांसाठी अल्पोपहाराची सोय केली. हे सर्व कार्यक्रम कर्मयोगी पांडुरंग सहकारी साखर कारखान्यचे संचालक लक्ष्मण धनवडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी सरपंच नर्मदा धनवडे, उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य शुभांगी कोल्हे, अमृता गायकवाड, अलका माने, शोभा आहेर, डॉ.स्वप्नाली शिंदे, वर्षाराणी नलवडे, विष्णू माने, ज्ञानेश्वर बरडे, सुनील माने, बळवंत धनवडे, विजय कोळेकर, पोपट पाटील,दत्तात्रय बनसोडे, मुकुंद घाडगे, पिनू माने,बापू कोले, संदीप हिंगमिरे, शिवाजी वसेकर, महेश माने, ज्ञानेश्वर वाघमोडे, महादेव डुबल उपस्थित होते. प्रास्ताविक ग्रामपंचायत अधिकारी संतोष गायकवाड यांनी केले. तर ग्रामपंचायत सदस्या शुभांगी कोल्हे यांनी आभार मानले.

---

## शासकीय कागदपत्रांमध्ये ‘राजाभिषेक शक’ सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

मराठी समाजात भारतीय कालगणनेची जाणीव दृढ व्हावी तसेच स्वराज्यकालीन ऐतिहासिक परंपरेचा सन्मान राखला जावा या उद्देशाने शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील कागदपत्रांमध्ये तसेच दैनंदिन शासकीय व्यवहारात भारतीय तिथी, शालिवाहन शक आणि राजाभिषेक शक यांचा उल्लेख करण्यात यावा, अशी मागणी करणारे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले.

हे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना देण्यात आले. शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने हे निवेदन सादर करण्यात आले असून हिंदु समाजात भारतीय कालगणनेची परंपरा पुन्हा दृढ व्हावी आणि स्वराज्यकालीन इतिहासाची जाणीव समाजात वाढावी, हा या मागणीमागील मुख्य उद्देश असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था तसेच विविध प्रशासकीय कार्यालयांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कागदपत्रांमध्ये ग्रेगोरियन दिनांकासोबत भारतीय तिथी, शालिवाहन शक आणि राजाभिषेक शक यांचा उल्लेख करणे अनिवार्य करण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच सर्व शासकीय कार्यालयांमध्ये भारतीय तिथीदर्शिका किंवा पंचांग उपलब्ध करून देणे, शासकीय कार्यक्रम व बैठकींमध्ये तिथीचा उल्लेख करण्याची प्रथा सुरू करणे आणि शाळा-महाविद्यालयांमध्ये भारतीय कालगणना प्रणालीविषयी जनजागृती करण्यासाठी उपक्रम राबविण्याची मागणीही करण्यात आली आहे. या तिथीदर्शिकेमध्ये भारतीय तिथी, शालिवाहन शक, स्वराज्यकालीन राजाभिषेक शक तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील ऐतिहासिक घटना आणि स्वराज्य इतिहासाशी संबंधित महत्त्वपूर्ण माहिती समाविष्ट असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. याप्रसंगी शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक अध्यक्ष मारुती सिंधुबाई दिगंबर सुरवसे, वैजनाथ स्वामी, स्वप्निल सावळगी, ऋतुराज पाटील आणि धनराज पाटील उपस्थित होते.

---

# जालिहाळचा सुपुत्र मनोज पाटील युपीएससीत देशात ४९३ वा

### सोन्याळ शिक्षक परिवाराकडून गौरव; ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी यश

**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

मंगळवेढा तालुक्यातील दुष्काळी पट्ट्यातील जालिहाळ गावचा सुपुत्र मनोज रामचंद्र पाटील यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत देशात ४९३ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सोन्याळ शिक्षक परिवाराच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

मनोज पाटील हे सामान्य व मध्यम वर्गीय कुटुंबातून पुढे आलेले व्यक्तिमत्व आहे. त्यांचे वडील सेवानिवृत्त शिक्षक असून आई गृहिणी आहेत. शेतीशी निगडित कुटुंबातून येऊनही मनोज यांनी शिक्षणाच्या जोरावर मोठे ध्येय गाठण्याचा ध्यास घेतला. कष्ट, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर त्यांनी देशातील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या यूपीएससी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले. सोन्याळ शिक्षक परिवाराच्या वतीने वरिष्ठ मुख्याध्यापक बसवराज बिरादार यांच्या नेतृत्वाखाली आयोजित कार्यक्रमात त्यांचे नातेवाईक असलेल्या मनोज पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या पालकांचाही सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी मनोज पाटील यांच्या यशाबद्दल अभिनंदन करत त्यांच्या पुढील प्रशासकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास शिक्षक नेते श्रीशैल मुचंडी, काष्ट्राईब संघटनेचे विभागीय कार्याध्यक्ष लखन होनमोरे, निवृत्त मुख्याध्यापक भीमराय बिरादार, वरिष्ठ मुख्याध्यापक धानप्पा शिंगे, शिक्षक नेते व शिक्षण संस्थेचे पदाधिकारी राजेंद्र बिराजदार (उटगी), सिदाण्णा बिरादार, अशोक मुचंडी, चंद्रशेखर पुजारी, सुभाष कोळी यांच्यासह मनोज पाटील यांचे वडील रामचंद्र पाटील, आई येसूबाई पाटील, चुलते लक्ष्मण पाटील, बापूराय पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती (मंगळवेढा) संचालक बसवंत पाटील, रवी पाटील उपस्थित होते.



> **जिद्द-चिकाटीच्या जोरावर दुष्काळी गावातून यूपीएससीपर्यंत झेप**
>
> मंगळवेढा तालुक्यातील दुष्काळी पट्ट्यातील जालिहाळ या छोट्याशा गावातील मनोज रामचंद्र पाटील यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत देशात ४९३ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ग्रामीण व साध्या कुटुंबातून आलेल्या मनोज यांनी प्रतिकूल परिस्थितीतही सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. दुष्काळी भागातील एका छोट्याशा गावातून देशातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवून मनोज पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. मोठी स्वप्ने पाहून सातत्याने प्रयत्न केल्यास कोणतीही अडचण यशाच्या आड येत नाही, हे त्यांनी आपल्या यशातून दाखवून दिले आहे. त्यांच्या या यशामुळे जालिहाळसह परिसरात अभिमानाची भावना व्यक्त होत असून अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांकडे प्रेरणेने पाहू लागले आहेत.

> **मोठी स्वप्ने पाहा : पाटील**
>
> यूपीएससी परीक्षेत यश मिळवल्यानंतर प्रतिक्रिया देताना मनोज पाटील म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहण्यास घाबरू नये. परिस्थिती कितीही साधी किंवा कठीण असली तरी सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते. अपयश आले तरी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करत राहिल्यास यश निश्चित मिळते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांकडे आत्मविश्वासाने पाहावे, असे आवाहन त्यांनी केले.

---

## फायनान्स कंपनीची फसवणूक केल्याप्रकरणी मूल्यमापनकर्त्याला अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**

**पंढरपूर, दि. १३ मार्च-**

तारण मालमत्तेचे खोटे मूल्यमापन करून तसा खोटा अहवाल होम फायनान्स कंपनीला देऊन संगनमताने कंपनीची सुमारे साडे बारा लाख रुपयांच्या कर्ज रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी मूल्यमापनकर्ता बिपीन इरण्णा स्वामी यांचा पंढरपूर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश ओंकार देशमुख यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला.





याची हकीकत अशी की, आंबे,शिरगांव - पंढरपूर येथील कर्जदारांना खोट्या मालमत्तेचे मूल्यमापन करून तसा खोटा अहवाल आरोपी बिपीन स्वामी यांनी अन्य नऊ आरोपींबरोबर संगनमत करून कर्जदारांसाठी दिल्यामुळे के.आर.एफ.एस. हाऊसिंग फायनान्स कंपनीचे सुमारे साडे बारा लाख रुपयांचे नुकसान व फसवणूक केली. अशा आशयाची फिर्याद फायनान्स कंपनीचे सोलापूर येथील मुख्य व्यवस्थापक दीपककुमार केन यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात दिल्यावरून दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे मूल्यमापनकर्ता बिपीन स्वामी यांनी सोलापूर येथील अॅड. अथर्व अंदोरे आणि अॅड. आल्हाद अंदोरे यांच्या मार्फत पंढरपूर सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता.

कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दाखविलेल्या मालमत्तेचे स्वामी यांनी योग्य मूल्यमापन केले असल्याचा कागदोपत्री पुरावा अॅड. अथर्व अंदोरे यांनी न्यायालयात सादर करून आरोपी स्वामी हे कर्ज मंजूर करणारे कंपनीचे अधिकारी नाहीत. त्यामुळे आरोपीस खोट्या खटल्यात गुंतवले असल्याचा युक्तिवाद केला. तो युक्तिवाद मान्यकरून न्यायाधीशांनी आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर केला. यात आरोपीतर्फे अॅड. अथर्व अंदोरे, अॅड. आल्हाद अंदोरे यांनी काम पाहिले. तर सरकार तर्फे अॅड. वांगीकर यांनी काम पाहिले.

आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## एस.एच.कोळेकर यांची मंडल कृषी अधिकारीपदी पदोन्नती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील उप कृषी अधिकारी पदावर कार्यरत एस.एच.कोळेकर यांची मोहोळ तालुक्यातील कुरुल-कामती येथे मंडल कृषी अधिकारी पदावर नुकतीच पदोन्नती झाली आहे.

या पदोन्नतीबद्दल पिलीव कृषी मंडल कार्यालयाच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पिलीव मंडलच्या कृषी अधिकारी खरात, उमेश मोहीते, कृषी सहायक नितीन शिंदे, फडतरे, सुधीर बुगड, देशमुख, भातलवंडे मॅडम, पवार मॅडम, कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील तसेच सर्व अधिकारी यावेळी उपस्थित होते.



# करमाळ्याच्या सभापतीपदी पूजा ढेरे, उपसभापतीपदी अ‍ॅड. अजित विघ्ने

### पंचायत समितीत भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस युतीची सत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा,दि.१३ मार्च-**

करमाळा तालुका पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपाकडून वीट गणातून मताधिक्याने निवडून आलेल्या पूजा सचिन ढेरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर उपसभापतीपदी केतुर गणातून राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे बहुमताने निवडून आलेले अ‍ॅड. अजित सर्जेराव विघ्ने यांची निवड करण्यात आली. करमाळा पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या विशेष बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली. या निवडीमुळे पंचायत समितीत भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस युतीची सत्ता स्थापन झाली आहे.

सभापती व उपसभापती पदासाठी आयोजित बैठकीस पंचायत समितीचे सर्व सदस्य यामध्ये भरत आवताडे(हिसरे), वनमाला सरडे (चिखलठाण) सोनाली तकिक (वांगी) नाना झाकणे (कोर्टी) दशरथ घाडगे (साडे) संध्या कांबळे (रावगाव) आदिती पाटील (उमरड) ललिता शिरस्कर (जेऊर) स्वप्निल काळे (पांडे) ज्ञानेश्वर बिचितकर (केम) उपस्थित होते. या निवडणूक प्रक्रियेसाठी अध्याशी अधिकारी



लक्ष्मण कसेकर सचिव म्हणून गटविकास अधिकारी अमित कदम यांनी निवडणूक प्रक्रियेस सहकार्य केले. यावेळी तहसीलदार शिल्पा ठोकडे उपस्थित होत्या. नियोजित कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज स्वीकृती, छाननी आणि निवड प्रक्रिया पार पाडण्यात आली व दोघांची बिनविरोध निवड करण्यात आली. पंचायत समितीत भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेसचे संख्याबळ लक्षात घेता दोन्ही पक्षांनी युतीच्या माध्यमातून सभापती व उपसभापती पदाची निवड निश्चित केली. सत्तेचे समान वाटप या सूत्रानुसार सभापतीपद भाजपाला तर उपसभापतीपद राष्ट्रवादीला देण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार सभापतीपदी पूजा ढेरे तर उपसभापतीपदी अ‍ॅड. अजित विघ्ने यांची निवड जाहीर करण्यात आली.

दरम्यान, सभापतीपदासाठी आमदार नारायण पाटील यांचे बंधू माजी सभापती अतुल पाटील यांच्या पत्नी आदिती पाटील यांनी अर्ज दाखल केला होता. मात्र पंचायत समितीतील संख्याबळ भाजप-राष्ट्रवादी युतीकडे असल्याने अखेर त्यांनी माघार घेतली. केतुरला तब्बल १९ वर्षांनंतर उपसभापतीपदाचा बहुमान मिळाला आहे. पंचायत समितीा निवडणुकीवेळी माजी आमदार संजयमामा शिंदे व भाजपच्या महिला प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप-राष्ट्रवादी युती करून ही निवडणूक लढवली. युतीमुळे पंचायत समितीत सत्ता स्थापन करण्यात यश आले. नव्याने निवडून आलेल्या सभापती पूजा ढेरे व उपसभापती अ‍ॅड. अजित विघ्ने यांचे विविध मान्यवर व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले. भाजपा महिला प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल, माजी आमदार संजयमामा शिंदे, मार्गदर्शक विलासराव घुमरे, युवा नेते दिग्विजय बागल, भाजप जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, प्रा. शिवाजी बंडगर यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. या निवडीमुळे करमाळा तालुक्यातील पंचायत समितीच्या कारभाराला नवे नेतृत्व मिळाले असून ग्रामीण भागातील विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, आरोग्य तसेच ग्रामीण पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी पंचायत समितीच्या माध्यमातून प्रभावी काम केले जाईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली आहे.




## शिवाजी पॉलिटेक्निक आणि आयटीआय संस्थेत सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ मार्च-**

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष यंत्रसामुग्रीचा अनुभव मिळावा आणि त्यांच्यातील कौशल्य विकास वाढीस लागावा या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष महादेव गायकवाड, सचिव अंकुश गायकवाड आणि विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज, सांगोला आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सांगोला यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

या कराराअंतर्गत सांगोला आयटीआय कॉलेजमधील विद्यार्थ्यांना दि.९ ते ११ मार्च रोजी प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना विविध यंत्रसामुग्रीचे कार्य, त्यांचा वापर आणि तांत्रिक प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमासाठी शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मधील मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख प्रा.संदीप बावचे, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा.अभिषेक शिवशरण, प्रा.विद्याधर पैलवान, प्रा.सिमरन इनामदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी शिवाजी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. रणजीत देशमुख, आयटीआय कॉलेजचे प्रा.शिकलगार, प्रा.घाडगे उपस्थित होते.

## ‘ओसी स्पेशालिटीज’मध्ये सुरक्षेबाबत जनजागृती

### ५५ वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

५५ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्तहानिमित्त ओसी स्पेशालिटीज प्रा. लिमिटेडमध्ये दि. ४ ते १० मार्च दरम्यान सुरक्षित व अपघातमुक्त कामकाजाचे धडे देत सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

सुरक्षितता वाढविण्यासाठी लोकांचा सहभाग, शिक्षण आणि सक्षमता या वर्षीच्या थीमनुसार कंपनीत आठवडाभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सप्ताहाच्या प्रारंभी प्रथम सेफ्टी ध्वज फडकवण्यात आला. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुरक्षा शपथ घेऊन काम करताना सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची प्रतिज्ञा केली. उद्योगसमूहात कर्मचारी हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या आरोग्य व सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते.

कंपनीचे प्लांट हेड मनोज बागल यांनी कर्मचाऱ्यांना औद्योगिक सुरक्षितता, आरोग्य व पर्यावरण संरक्षण याबाबत मार्गदर्शन केले. तसेच कामाच्या ठिकाणी वैयक्तिक सुरक्षा साधनांचा योग्य व नियमित वापर करण्याचे महत्त्व सांगितले. सुरक्षा विषयक माहिती तसेच राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे उद्दिष्ट याबाबत भूषण चौधरी यांनी माहिती दिली.



यावेळी प्रश्नमंजुषा, सुरक्षा घोषवाक्य स्पर्धा, सुरक्षा पोस्टर स्पर्धा, मराठी आणि हिंदी सुरक्षा कविता स्पर्धा तसेच सुरक्षा विषयक दोन नाटक सादर करण्यात आले. याशिवाय कामाच्या ठिकाणी सुरक्षा साधनांचा वापर का आवश्यक आहे आणि निष्काळजीपणामुळे होणाऱ्या अपघातांचे परिणाम काय असू शकतात याचे प्रभावी सादरीकरण करणारी लघुनाटिका देखील सादर करण्यात आली. सप्ताहात सुरक्षा साधनांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यामध्ये अग्निसुरक्षा उपकरणे, वैयक्तिक सुरक्षा साधने तसेच आपत्कालीन परिस्थितीत वापरल्या जाणाऱ्या साधनांची माहिती कर्मचाऱ्यांना देण्यात आली. कार्यक्रमास कंपनीतील अधिकारी प्रवीण पाटील, आनंद कनका, सचिन पडवळ, अर्जुन वाले, कर्मचारी, महिला कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आझाद मैदानावर ‘प्रहार’चा ‘जागरण गोंधळ’

**जेऊर, दि.१३ मार्च-**

करमाळा तालुक्यातील केम, जातेगाव, पोथरे आणि कोर्टी, अर्जुननगर या गावांमधील रूपांतरित साठवण पाझर तलावाच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि निकृष्ट काम झाल्याचा आरोप करत प्रहार जनशक्ती पक्ष शेतकरी संघटनेच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानावर अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी 'पोतराज' वेशभूषा करून आणि 'जागरण गोंधळ' घालत सरकारचे लक्ष वेधून घेतले.

आझाद मैदानावर झालेल्या या आंदोलनात बॅनरबाजी आणि पारंपरिक वेशभूषेमुळे सर्वांचे लक्ष वेधले गेले. या आंदोलनात अब्बास आली यादगीर, मुजाहिद सय्यद, प्रवीण चव्हाण, प्रताप तळेकर, सोमनाथ देवकर, मच्छिंद्र कोकाटे, रवींद्र मोरे, वैभव कोकाटे यांच्यासह करमाळा तालुक्यातील मोठ्या संख्येने शेतकरी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांची 'एसआयटी' चौकशी करा**

या आंदोलनाद्वारे प्रहार जनशक्ती पक्षाने भ्रष्टाचाराला पाठीशी घालणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने : नितीन दुसाने (मुख्य अभियंता), चेतन कलशेट्टी (अधीक्षक अभियंता), सुहास गायकवाड (दक्षता गुण नियंत्रण पथक), राहुल क्षिरसागर (कार्यकारी अभियंता, जलसंधारण विभाग) यांच्यावर एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी ठेकेदाराच्या निकृष्ट कामाकडे डोळेझाक करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

> शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी असलेल्या तलावांच्या कामात भ्रष्टाचार करणे हा गुन्हा आहे. अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने जनतेचा पैसा लाटला जात आहे. जोपर्यंत दोषींवर कारवाई होत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील.
>
> **- अजित कुलकर्णी**
> (सोलापूर शहराध्यक्ष, प्रहार जनशक्ती पक्ष)

**शिवनेरी कन्स्ट्रक्शनला 'ब्लॅकलिस्ट' करा**

तलावाचे काम करणाऱ्या शिवनेरी कन्स्ट्रक्शनचे शिवाजी तळेकर यांनी प्रशासनाची दिशाभूल करून निकृष्ट दर्जाचे काम केले आहे. त्यामुळे तळेकर यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांना 'ब्लॅकलिस्ट' (काळ्या यादीत) टाकण्यात यावे, अशी आग्रही मागणी सोलापूर शहराध्यक्ष अजित कुलकर्णी आणि करमाळा तालुकाध्यक्ष संदीप तळेकर यांनी केली आहे.





## चैत्री यात्रेत गॅस पुरवठ्याला प्राधान्य द्या : प्रांताधिकारी इथापे

### उन्हाबाबत आवश्यक उपाययोजना तसेच खाद्यपदार्थ तपासणी मोहीम राबवावी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ मार्च -**

चैत्री शुध्द एकादशी २९ मार्च रोजी असून, या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात.यात्रेत शहरात व परिसरात विविध ठिकाणी खाद्यपदार्थ विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची दुकाने उभारण्यात येतात. या कालावधीत गॅसचा काळाबाजार, साठेबाजी रोखण्यासाठी विशेष पथकामार्फत तपासणी करून घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत राहील याबाबतची प्राधान्याने दक्षता घ्यावी अशा सूचना येथील प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, सध्या उन्हाळा सुरु असून, दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. यात्रेसाठी येणा-या भाविकांना उष्णतेचा त्रास होवू नये यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात तसेच औषधोपचारासाठी आवश्यक असलेली सर्व सामुग्री उपलब्ध ठेवावी. मंदिर समितीने दर्शन रांग व पत्रा शेडमध्ये पंखे, कुलर्स मॅट, स्वच्छ व मुबलक पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. भाविकांना तात्काळ व सुलभ दर्शन व्यवस्थेबाबत नियोजन करावे.यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना तसेच स्थानिक नागरिकांसाठी मुबलक व स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा यासाठी नगरपालिकेने नियोजन करावे. आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याची टँकरची संख्या वाढवावी. शहरातीलिअतिक्रमणे व बेकायदेशीर होर्डींग तात्काळ काढावेत. चैत्री यात्रा उन्हाळ्याच्या दिवसात असल्याने अन्न पदार्थ लवकर खराब होण्याची शक्यता आहे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनाने हॉटेल, उपवासाचे पदार्थ विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करण्यासाठी पथके नेमून मोहीम राबवावी. आरोग्य विभागाने वारी कालावधीत वैद्यकीय पथके कार्यरत ठेवावी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करावी पुरेसा औषधसाठा उपलब्ध करुन ठेवावा. वीज वितरण कंपनीने सुरक्षित व अखंडीत वीज पुरवठा सुरु ठेवावा.एस.टी.महामंडळाने प्रवाश्यांसाठी बस स्थानकात २४ तास पिण्याचे पाणी उपलब्ध राहिल याची व्यवस्था करावी. अशा सूचनाही इथापे यांनी दिल्या.




यावेळी प्रांतधिकारी इथापे यांनी सार्वजनिक बांधकाम, तहसिल, पोलीस प्रशासन, पाटबंधारे, एस.टी, पुरवठा विभाग आदी विभागांचा आढावा घेवून संबंधितांना आवश्यक सूचना दिल्या.

**जादा हंगामी कर्मचारी लावणार : मुख्याधिकारी**

यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे यासाठी बोअरवेल, हातपंपाची पाणी तपासणी करण्यात येत आहे. जादा हंगामी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. ६५ एकरमध्ये भाविकांच्या सुविधेसाठी पाणी, वीज, स्वच्छता आदी सुविधा उपलब्ध येणार असल्याचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

**मंदिर समिती भाविकांना सुविधा पुरविणार**

चैत्री यात्रा कालावधीत पत्राशेड, दर्शन रांग, दर्शन मंडप, मंदीर मंदीर परिसर येथील स्वचछता मंदीर समितीच्या वतीने करण्यात आहे. यासाठी स्वयंसेवक व मंदीर समितीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात येत असल्याचे मंदीर समितीचे व्यवस्थापक श्री. भोसले यांनी सांगितले.

**बैठकीसाठी या अधिकाऱ्यांची उपस्थिती**

चैत्री यात्रा नियोजनाबाबत प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली यावेळी तहसिलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, मंदीर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संभाजी भोसले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे घोडके तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



## गॅस दरवाढ मागे घ्या; पंढरपूर काँग्रेसचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ मार्च -**

केंद्र सरकारने एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरामध्ये अचानक वाढ करून महागाईत होरपळून निघालेल्या सर्वसामान्य जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. घरगुती गॅस सिलेंडर ६० रुपये तर व्यवसाय गॅस सिलेंडरच्या दरात ११५ रुपये केलेली दरवाढ रद्द करण्यात यावी अशी मागणी पंढरपूर शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली. याबाबतचे निवेदन काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना दिले.

आखाती युद्धामुळे गॅसचा तुटवडा जाणवत आहे. गॅस सिलेंडर साठी रांगा लावाव्या लागत आहेत.परंतु सध्या गॅसचा तुटवडा नाही हा सरकारचा दावा चुकीचा असून दरवाढी सोबत गॅस बुकिंगचा कालावधी पण वाढविला आहे. सर्वसामान्य जनता व हॉटेल व्यवसायांना गॅस उपलब्ध होत नाही. हॉटेल व्यवसाय बंद होत आहेत. दरवाढ अन्यायकारक असून सरकारने दरवाढ तत्काळ मागे घ्यावी तसेच एलपीजी घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडर पुरवठा सुरळीत करून ग्राहकांना सहज उपलब्ध करून द्यावेत असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संदीप पाटील,उपाध्यक्ष सादिक मुलाणी, शहराध्यक्ष आदित्य फत्तेपूरकर, शेकापचे डॉ.अनिकेत देशमुख, युवक काँग्रेसचे अध्यक्ष संदीप शिंदे, विकास नागटिळक, विलास रोंगे, संतोष गोंजारी आदी उपस्थित होते.